
समर्थन

देणगी मूल्य
१५ रुपये

# पुरवणी मागण्या अर्थात बेबंद खर्चाची कुरणे




पुरवणी मागण्यांचे वर्षागणिक वाढते प्रमाण

**विधिमंडळ सदस्य याचा गांभिर्याने विचार करणार का?**

## पुरवणी मागणी कधी करता येते ?

### नियम

- अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना ज्याचा अंदाज करता आला नाही अशा कारणांमुळे खर्चासाठी नव्याने वा वाढीव तरतूद करावयाची झाल्यास किंवा
- अकल्पित व तातडीचा खर्च भागविण्यासाठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या आगाऊ रकमेची भरपाई करावयाची झाल्यास

### वस्तुस्थिती

भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या अहवालांनुसार (नागरी) खर्चाचा पूर्व अंदाज करता येणे शक्य असतानाही मोठ्या प्रमाणावर आकस्मिकता निधीतून अग्रिमे काढण्यात येतात.

| वर्ष | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|
| अग्रिमे (रु.कोटीत) | १५१.५१ | ५६३.५७ | ४५.६१ |

उदा. जुलै २००६ मध्ये सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये महसूल व वन विभागाने प्रलंबित देयके, इमारतीचे भाडे, दुरुस्ती यासाठी ३५ कोटी रुपयांची पुरवणी मागणी केली होती. अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना या खर्चाचा अंदाज करणे सहजच शक्य होते.


## पुरवणी मागण्यांसंदर्भात अंदाज समितीच्या शिफारशी

### शिफारस

शासनाकडे आवश्यक तो निधी असल्याशिवाय अथवा आवश्यक उत्पन्न मिळालेले असल्याखेरीज पुरवणी मागणी करण्यात येवू नये.

### वस्तुस्थिती

मूळ मागणी व पुरवणी मागणी मिळून होणाऱ्या एकूण मागणीच्या तुलनेतच नव्हे तर मूळ मागणी पेक्षाही प्रत्यक्ष खर्च कमी दिसतो. मूळ मागण्यांवरीलच खर्च भागविण्यासाठी निधी उपलब्ध नसताना पुरवणी मागण्या केल्या जातात हे पुढील आलेखावरून स्पष्ट होते.




| | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ |
|---|---|---|---|
| मूळ मागणी | ६४५६४.९६ | ७०१४०.०८ | ७९२१५.४० |
| पुरवणी तरतूद | १०८९७.३१ | १९८३४.६८ | २५७३६.८६ |
| एकूण खर्च | ६१६६४.८९ | ७१२०५.७३ | ७६५०६.१५ |

स्रोत : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अहवाल (नागरी) व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश

एवढेच नव्हे तर अनेकदा आवश्यकता नसतानाही पुरवणी मागण्या केल्या जातात हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| वर्ष | मागण्यांची संख्या | मूळ मागणी | पुरवणी मागणी | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| २००२-०३ | ५७ | २४१७३.३१ | १७२७.६७ | ११७९८.७७ |
| २००३-०४ | ५६ | १७३२४.५२ | १५७४.३३ | ११७०७.२५ |
| २००४-०५ | ४७ | २४७१९.६२ | १४४८.३१ | १११४३.९८ |

स्रोत : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अहवाल (नागरी)

## शिफारस

**पुरवणी मागणी करताना विभागांनी स्वयंशिस्त लावून घेणे गरजेचे आहे. विभागांची पुरवणी मागणी मूळ अर्थसंकल्पाच्या २५%पेक्षा जास्त असता कामा नये.**

## वस्तुस्थिती

**वर्ष २००४-०५ व २००५-०६ मध्ये सर्वाधिक प्रमाणात पुरवणी मागण्या करणारे पाच विभाग**

| २००४-०५ | | | | | २००५-०६ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विभाग | मूळ मागणीची रक्कम (रु.कोटीत) | पुरवणी मागणीची रक्कम (रु.कोटीत) | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण | पुरवणी मागणीचे एकूण मागणीत प्रमाण* | विभाग | मूळ मागणीची रक्कम (रु.कोटीत) | पुरवणी मागणीची रक्कम (रु.कोटीत) | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण | पुरवणी मागणीचे एकूण मागणीत प्रमाण* |
| सहकार व वस्त्रोद्योग | ७२०.७२ | २४५९.९३ | ३४१.३१ | ७७.३४ | सहकार व वस्त्रोद्योग | ८०२.०० | ३१२१.७१ | ३८९.२४ | ७९.५६ |
| जलसंपदा | २५३८.५९ | ५०८४.९८ | २००.३१ | ६६.७० | महसूल व वन | १६१८.५० | २४७४.०७ | १५२.८६ | ६०.४५ |
| उद्योग, ऊर्जा व कामगार | १५५०.७२ | २४७४.९५ | १५९.६० | ६१.४८ | उद्योग, ऊर्जा व कामगार | २१५३.२३ | २७८४.८१ | १२९.३३ | ५६.३९ |
| रोजगार व स्वयंरोजगार | ३८.८० | ५०.०० | १२८.८६ | ५६.३१ | रोजगार व स्वयंरोजगार | २१२.०२ | १५१.६१ | ७१.५१ | ४१.६९ |
| सामान्य प्रशासन | २५४.९७ | १४८.५७ | ५८.२७ | ३६.८२ | [illegible] | २८६९.८९ | १३५७.९० | ४७.३१ | ३१.१२ |

स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचे पूरक विवरणपत्र

*- एकूण मागणी = मूळ मागणी + पुरवणी मागणी

## शिफारस

''अतिरिक्त खर्च समायोजित करण्यासाठी शासनाकडून आकस्मिकता निधीची मूळ मर्यादा तात्पुरत्या स्वरुपात बऱ्याचदा वाढविण्यात येते... पुष्कळदा असा खर्च सत्ताधारी पक्षाच्या राजकीय गरजा व अत्यावश्यक गोष्टी भागविण्यासाठी केला जातो... त्यामुळे विधानमंडळाचे प्राधिकार धोक्यात येतात...'' गोडबोले समितीच्या या मताशी सहमती दर्शवित अंदाज समितीने पुढील शिफारस केली:

''आकस्मिकता निधितून रक्कम काढण्यासंबंधी एक नियमावली तयार करण्यात यावी व त्यात कोणत्या परिस्थितीमध्ये व कोणत्या प्रकारा अंतर्गत किती रक्कम काढण्यात येईल याबाबत विशिष्ट असे निकष घालून द्यावेत जेणेकरून या फंडाचा गैरवापर टाळता येईल ''

## वस्तुस्थिती

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालानुसार(नागरी) आकस्मिकता निधीची मूळ तरतूद रु. १५० कोटी असताना अध्यादेशाद्वारे ती तात्पुरत्या स्वरुपात पुढीलप्रमाणे वाढवण्यात आली.

| दिनांक | रुपये कोटीत |
|---|---|
| १३ जून २००३ | ७५० |
| २४ ऑक्टोबर २००३ | ४०० |
| १७ मे २००४ व १५ सप्टेंबर २००४ | ३०० |

तसेच वर्ष २००४-०५ मध्ये आकस्मिकता निधीतून काढलेल्या अग्रिमांपैकी रु.१०४ कोटी ५२ लाखांची भरपाई केलेली नव्हती.

## पुरवणी मागण्यांवरील चर्चेसंदर्भात अंदाज समितीचे मत :

''विधानमंडळात पूरक मागण्यांवर फक्त २ दिवस चर्चेला असतात. या दोन दिवसात फक्त ५ विभागांची चर्चा होते. सर्व काम सुरळीत चालल्यास चर्चेसाठी ६ तास उपलब्ध होतात. त्यामध्येच खात्याच्या मंत्र्यांच्या उत्तराची वेळ समाविष्ट आहे. म्हणजे साधारणत: ६ तास एकूण २८९ सदस्यांना उपलब्ध असतात व ही वेळ बऱ्याच वेळा सदस्यांना अपुरी पडते. त्यामुळे बऱ्याचदा चर्चा न करता विधानमंडळाकडून पूरक मागण्या मंजूर केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे''.

## विधानसभेत पुरवणी मागण्यांवर प्रत्यक्ष चर्चा

| वर्ष | चर्चेसह संमत झालेल्या पुरवणी मागण्या | | चर्चेशिवाय संमत झालेल्या पुरवणी मागण्या | |
|---|---|---|---|---|
| | मागण्यांची संख्या | रक्कम (रु.कोटीत) | मागण्यांची संख्या | रक्कम (रु.कोटीत) |
| २००२-०३ | ३९ | २३३८.६७ | १४८ | ८५५८.६४ |
| २००३-०४ | ३२ | ७२९६.८३ | १६५ | १२५३७.८४ |
| २००४-०५ | ४३ | ७७३०.३८ | १४३ | १८००६.४७ |
| २००५-०६ | ५७ | ५२७४.२० | १६० | १४४३९.९२ |

स्रोत : संक्षिप्त अहवाल व खर्चाचे पूरक विवरण पत्र

वरील तक्त्यावरून चर्चेसह संमत झालेल्या पुरवणी मागण्यांची संख्या कमी दिसतेच आहे. मात्र याचा अर्थ असाही नव्हे की या सर्व मागण्यांवर चर्चा झालीच असेल. अनेकदा मागण्या कार्यक्रमात चर्चेसाठी घेतल्या जातात मात्र विविध कारणांमुळे प्रत्यक्षात त्यावर चर्चा होतच नाही. उदाहरणच द्यावयाचे झाले तर जुलै २००६ मध्ये विधानसभेत गोंधळामुळे पुरवणी मागण्यांवर बिलकूल चर्चा झालेली नाही.

मान. विधिमंडळ सदस्य,

विधिमंडळ सदस्य या नात्याने प्रशासनावर आर्थिक नियंत्रण ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी आग्रही राहून आपण शासनाला पुरवणी मागण्या व आकस्मिकता निधीच्या दुरुपयोगासाठी जबाबदार धरणार आहात का?

निर्मिती आणि प्रकाशन –'समर्थन' दूरध्वनी: २२४२ ५२९२ • Email: samarthanmumbai@vsnl.net
मुद्रक : चिंतनाक्षर ग्राफिक्स, वडाळा, मुंबई